नियमित दिवाणी दावा क्र. ३८/२०१४
प्रविण मुंबरकर वि. भाऊ मुंबरकर व इतर
निशाण क्र. ७५

## <u>निशाणी क्र. ७५ वर आदेश</u>

प्रस्तुत अर्ज अर्जदार रसिका राजेंद्र तिर्लोटकर हिने दाव्यात पक्ष म्हणून समाविष्ट करण्याकरीता दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जास वादीने निशाण क्र. ७७ प्रमाणे आपले म्हणणे दाखल केले. तसेच प्रतिवादी क्र. १ याने नि. ७८ येथे म्हणणे दाखल केले. प्रस्तुत अर्ज, वादी प्रतिवादी यांचे म्हणणे व संपूर्ण अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही पक्षांचा दिर्घ युक्तीवाद ऐकण्यात आला व अर्जदार तर्फे निशाण क्र. ८० येथे दाखल युक्तीवादाचे अवलोकन केले.

२. प्रस्तुत अर्जातील तथ्य लिहिण्यापुर्वी प्रकरणातील संपूर्ण परिस्थिती विषद करणे आवश्यक आहे. वादीने प्रस्तुतचा दावा दावा मिळकतींचे सरस निरस मानाने वाटप होवून ताबा मिळणेकरीता दाखल केला आहे.

३. अर्जदार याने असे कथन केले आहे की, तिने दि. १३/०१/२०२२ रोजी भाऊ जनार्दन मुंबरकर वगैरे १३ यांचेविरुध्द मौजे मिठमुंबरी येथील स.नं. ४७ हि.क्र. १ या मिळकतीबाबत कायदेशीर वारस असल्याबाबतचा हक्कप्रस्थापनेचा ठराव, अर्जदार हिच्या १/१५ हिश्श्याचे वाटप, आज्ञार्थी तकीद वगैरे करीता दावा दाखल केला होता. सदरचा दावा दाखल करतेवेळी या मिळकतीबाबत रे.दि.मु.क्र. ३८/२०१४ चा वाटपाकरीता दावा दाखल असल्याचे समजले. रे.दि.मु.क्र. ३८/२०१४ या दाव्यामध्ये अर्जदार हि पक्षकार नाही. तिने दाखल केलेल्या दाव्यातील मिळकती व या दाव्यातील मिळकत ही एकच असल्याने व दोन्ही दाव्यातील काही पक्षकार सारखेच असल्याचे समजले. त्यामुळे अर्जदार हिला या दाव्यामध्ये नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने आवश्यक पक्षकार म्हणून सामिल करणे आवश्यक आहे. तिला या दाव्यात पक्षकार म्हणून सामिल करुन घेतले नाही तर तिचेवर अन्याय होणारा

असून तिचे अपरिमित स्वरुपाचे पैशाचे स्वरुपात भरुन न येणारे असे नुकसान होणार आहे. तरी तिला याकामी सामिल करुन तिला तिचे म्हणणे मांडण्याची संधी मिळणेसाठी न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. तरी तिने अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. वादीने सदर अर्जास प्रखर विरोध दर्शविला आहे. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, अर्जदार हिचा अर्ज खोटा, खोडसाळ व अप्रामाणिक हेतूचा आहे. अर्जदार हिचा दावा मिळकतीमध्ये कसा कायदेशीर हक्क सांगू पाहत आहे याबाबत कोणतेही वर्णन केलेले नाही अथवा कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. तिने या मिळकतीबाबत कोणता दावा दाखल केला आहे याचे देखील वर्णन केलेले नाही. त्यामुळे अर्जदार हिचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

५. प्रतिवादी क्र. १ याने नि. ७८ येथे म्हणणे दाखल अर्जास प्रखर विरोध केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार अर्जातील मजकूर चुकीचा व बेकायदेशीर असून याकामी वादीचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल होवून बराच कालावधी होवून वादीचा उलट तपास व्हावयाचा आहे. अशा परिस्थितीत अर्जदार हिला पक्षकार करुन घेतल्यास दाव्याची सुनावणी पुढील अनिश्चित काळासाठी लांबणीवर पडणार आहे. अर्जदार हिचे अर्जास कोणतेही कारण झाालेले नाही. अर्जात नमूद कारणे खोटी व खोडसाळ आहेत सबब, अर्ज नामंजूर करण्याची विनंती प्रतिवादी क्र. १ याने केली आहे.

६. तिन्ही पक्षांचे विस्तृत युक्तीवाद ऐकले, वादीतर्फे दाखल लेखी युक्तीवादाचे अवलोकन केले. अर्ज निकाली काढण्यांकरीता खालील मुद्दे उपस्थित होतात त्या करीताचे माझे निष्कर्ष कारणांसह नमूद केले आहेत.

| **अ. क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार असे सिध्द करते काय की, तिला प्रस्तुत दाव्यात पक्षकार म्हणून समाविष्ट करणे आवश्यक आहे ? | .... होकारार्थी. |
| २. | आदेश काय ? | .... अर्ज मंजूर करण्यात येतो. |

**<u>का र ण मि मां सा</u>**

**<u>मुद्दा क्र. १ करीता :—</u>**

७. या ठिकाणी सदर संहितेच्या आदेश १, नियम १०(२) चा संदर्भ देणे योग्य होईल.

> **आदेश १, नियम १०(२) —** ''न्यायालय पक्षकारांची नावे खोडून टाकू शकेल किंवा जादा दाखल करू शकेल. कार्यवाहीच्या कोणत्याही टप्पावर कोणत्याही पक्षकाराकडून आलेल्या अर्जावरून किंवा तसा अर्ज आला नसतानाही आणि न्यायालय न्याय्य वाटतील अशा अटींवर वादी म्हणून किंवा प्रतिवादी म्हणून अयोग्यपणे सामिल करून घेतलेल्या एखादया पक्षकाराचे नाव खोडून टाकण्यात यावे, आणि ज्या व्यक्तीला वादी म्हणून किंवा प्रतिवादी म्हणून सामिल करून घ्यावयास हवे होते किंवा दाव्यामध्ये गुंतलेल्या सर्व प्रश्नांचा परिणामकारकरित्या व पुर्णपणे अधिनिर्णय करून ते निकालात काढणे न्यायालयास शक्य होण्यासाठी ज्या व्यक्तींची न्यायालयासमोर हजेरी आवश्यक असेल अशा कोणत्याही व्यक्तीचे नाव जादा दाखल करण्यात यावे, असा आदेश न्यायालयास देता येईल.''

८. सदर संहितेच्या वरील प्रावधानाचे काळजीपुर्वक अवलोकन केले असता असे दिसते की, कोणत्याही व्यक्तीला दाव्यात पक्ष म्हणून समाविष्ट करावयाचे असल्यास खालील दोन अटींची पुर्तता होणे आवश्यक आहे.

अ. जेंव्हा, सदर पक्षास वादी किंवा प्रतिवादी म्हणून दाव्यात पक्ष म्हणून समाविष्ट करणे आवश्यक होते परंतु त्या व्यक्तीस समाविष्ट

करण्यात आलेले नाही, व

ब. जेंव्हा, सदर पक्षाचे अनुपस्थितीत, प्रकरणातील निर्णायक मुद्दा संपुर्णपणे निकाली काढता येणार नाही.

९. प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले असता असे दिसते की, अर्जदार तर्फे दाखल नि. ८० येथील युक्तीवादामध्ये अर्जदार हिने दाव्यातील दावा मिळकतीचे मुळ मालक फटू धननाक (धनाजी) महार उर्फ मुंबरकर याचे कायदेशीर वारस असल्याबाबतचा व अन्य दादीकरीता रे.दि.मु.क्र. ०४/२०२२ चा दाखल केलेला आहे. या वादीने दाव्यात दिलेली वंशावळ अपुर्ण असून अर्जदार ही या दाव्यातील वादी यांची सख्खी बहिण असल्याने ती याकामी आवश्यक पक्षकार आहे असे कथन केले आहे. प्रस्तुत दावा हा दावा मिळकतीचे वाटप होवून पृथक कब्जा मिळणेसाठी दाखल करण्यात आलेला आहे. अर्जदाराचे युक्तीवादावरुन ती वादीची सख्खी बहिण आहे. असे असल्यास, तिला या दाव्यात आवश्यक पक्षकार म्हणून सामिल करणे गरजेचे ठरते. वाटपाच्या दाव्यात सर्व पक्षकार सामिल असणे आवश्यक आहे. प्रस्तुत अर्जदार ही प्रस्तुत दाव्यात आवश्यक पक्षकार आहे. त्यामुळे वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान असलेले वादाचे निराकरण एकाच दाव्यामध्ये करणे शक्य होणार असून प्रकरणांची संख्या वाढून गुंता निर्माण होणार नाही.

१०. त्यामुळे अर्जदार ही प्रस्तुत दाव्यात आवश्यक पक्षकार/प्रतिवादी म्हणून समाविष्ठ होण्यास पात्र आहे. सबब मी मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. २ करीता :—</u>**

११. मी यापुर्वी मुद्दा क्र. १ ला होकारार्थी उत्तर नोंदविले आहे. करीता मी मुद्दा क्र. २ चे उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१. अर्जदारचा अर्ज निशाणी क्र. ७५ मंजुर करण्यात येतो.

२. वादीने अर्जदार यांना प्रतिवादी क्र. २१ म्हणून सामिल करुन दाव्यात योग्य ती दुरुस्ती आदेश तारखेपासून १४ दिवसाच्या आत करावी.

( श्रीमती एन.बी.घाटगे )
दिवाणी न्यायाधीश क. स्तर
देवगड.

दिनांक : २३/०१/२०२४